CR1972041222

३४५

क्र.हानि.ए.आर.५४

पुणे.दि. १२-४-७२

उपसंचालक भूमि अभिलेख पुणे,मुंबई,नागपूर,औरंगाबाद

एकत्रीकरण अधिकारी, सहायक एकत्रीकरण अधिकारी (सर्व)

विषय : मुंबईचा तुकडे प्रतिबंधक व ज.ए.कायदा १९४७

दस्त ऐवज नोंदणी बाबत.

मुंबईचा तुकडे प्रतिबंधक व ज.ए.कायदा १९४७ ची अंमलबजावणी, कायद्यातील तरतुदीनुसार योग्य प्रकारे व्हावी व अवैध हस्तांतरणास मोकळीक राहू नये म्हणून ज.ए.का.क.७,८,२७ व ३१ विरुध्द होणारे व्यवहार नोंदणी कायदा १९०८ चे कलम २२अ चे तरतुदीनुसार लोकहिताच्या धोरणा विरुध्द ठरवले असून त्याबाबत शासनाने महसूल व वन विभागाकडील क्र. आर.जी.एन.१०६८-,१७२०४१ एन.दि.२९-१-७२ ( महाराष्ट्र राजपत्र दि.१०-२-७२ भाग ४ अ पान १४८ वर प्रसिध्द झालेली ) अधिसूचना काढली आहे. ( प्रत सोबत आहे. ) ज्या गांवी जमीन एकत्रीकरण योजना हाती घेतली नाही. अशा गावांत तारवादि व्यवहार ज.ए.का.क.७ व ८ चे विरुध्द नसल्याबद्दल शिफारस पत्र तहसिलदाराचे दर्जाचे महसूल अथवा भूमापन अधिका-याकडून घेतल्यानंतरच असे तबदिलीच्या व्यवहाराचे कागदपत्र नोंदता येतील.ज.ए. योजनेचे काम चालू आहे. अशा गावांत नोंदणीपूर्वी ए.अ.यांची का.क.२७ब व नियम २२अ अन्वये परवानगी घेतली असल्यास तो कागद नोंदणीपूर्वी दाखवावी लागेल. त्याचप्रमाणे ए.योजना कार्यान्वित झाल्यानंतर का.क.३१ व नियम २७ अन्वये जिल्हाधिकारी अथवा आयुक्त यांचे ~~पूर्व~~ पूर्व परवानगीचे आदेश दाखवल्याशिवाय तबदिली बाबतचे कागदपत्र नोंदता येणार नाहीत.

वरील बाबींची अंमलबजावणी करण्यासाठी नोंदणी अधिका-यांचे जवळ प्रत्येक तालुक्यातील गावाबाबत प्रमाणभूत क्षेत्र काय आहे व ते कोणत्या अधिसूचनेनुसार ठरवले गेले आहे याबाबत माहिती असणे इष्ट आहे. त्याचप्रमाणे गांवी योजना चालू झाली व केव्हा कार्यान्वित झाली याबाबतही तपशील असणे इष्ट आहे. यापुढे ज.ए.योजना हाती घेतांच का.क.१५ अ चे नोटीसीची प्रत दुय्यम ~~शर्ती~~ निबंधकांकडे कटाक्षाने पाठवावी व योजना कार्यान्वीत होताच त्याबाबत गावांची यादी आणि योजना कार्यान्वित झाल्याची तारीख दुय्यम निबंधकांकडे कळवावी. ( पान २ पहा)

सोबत नोंदणी महानिरीक्षक यांचे क्र.एडीएसआर एफ ३१७ कॉन्ट्रा ४११२-५० दि.१३-३-७२ ची प्रत जोडली आहे. त्यातील परिच्छेद २ व ३ बाबतची माहिती जिल्ह्यातील नोंदणी अधिकाऱ्यांना जिल्हा निबंधक यांचे मार्फत द्यावी व तसे केल्याबद्दल प्रतिवेदन १५ दिवसांत या कार्यालयास पाठवावे.

पुं-६४७

जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख म.रा.पुणे करिता.

प्रतिलिपी नोंदणी महानिरीक्षक यांना त्यांचे क्र.एडीएसआर एफ ३१७ कॉन्ट्रा ४११२-५० दि.१३-३-७२ चे संदर्भात माहितीसाठी सादर अग्रेषित.

उपसंचालक भूमि अभिलेख
यांचे कार्यालय, पुणे
दिनांक 12 APR 1972
शाखा
संकलन

उपसंचालक भूमि अभिलेख,
पुणे प्रदेश, पुणे.